# भारतीय संघराज्याचे बदलते स्वरुप

**डॉ.दिलीपकुमार दगडू क्षीरसागर,** राज्यशास्त्र विभाग प्रमुख, आझाद महाविद्यालय औसा जि.लातूर पिन कोड ४१३५२०
मो.नं.९८९०४९४८५६ Email- dilipkumarkshirsagar३२१@gmail.com

---

**प्रस्तावना -**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटनच्या पारतंत्र्यातून, वसाहतवादातून स्वतंत्र झालेला भारत हा जगातील एक खंडप्राय देश असून भौगोलिक आकारमानानुसार जगातील ७ व्या क्रमांकाचा मोठा देश आहे. भारतात भाषीक, प्रादेशिक तसेच सांस्कृतीक विविधता असल्यामुळे विविध प्रांतातील लोकांना आपल्या भाषीक, प्रादेशिक व सांस्कृतीक अस्मीतेचे जतन करता यावे आणि त्या सोबतच राष्ट्रीय एकात्मता अबाधीत राहावी या प्रमुख उद्देशाने भारताने संघराज्य शासन प्रणाली स्विकारणे आवश्यकच होते. भारतातील संघराज्य शासन प्रणालीचा पाया ब्रिटीश राजवटीतच घातला गेला. ब्रिटीश राजवटीतील सन १९०९ चा मोर्लेमेंटो कायदा, सन १९१९ चा मॉन्टेंग्यु चेम्सफोर्ड कायदा आणि १९३५ चा कायद्याद्वारे ब्रिटीशानी भारतातील प्रांतांना टप्याटप्याने अधिकाधिक अधिकार सोपवले. यापैकी सन १९३५ चा कायदा हा भारतीय संघरराज्याच्या संदर्भात सर्वाधीक महत्वपूर्ण असून भारतीय संविधानाने स्वातंत्र प्राप्तीनंतर केंद्र व घटकराज्यामध्ये केलेली शासनविषयक अधिकारांची विभागणी सन १९३५ मधील कायद्यावर आधारल्याचे स्पष्ट होते. भारतीय संघराज्याचे बदलते स्वरुप या लेखात संघराज्य म्हणजे काय?भारतीय संघराज्याचे वैशिष्ट्ये तसेच भारतीय संघराज्याचे बदलते स्वरुप व समारोप या घटकांची मांडणी केलेली आहे.

**संघराज्य म्हणजे काय?**

संघराज्य हा एक शासनाचा प्रकार असून आधुनिक घटनात्मक शासनाच्या इतिहासात काही सार्वभौम राष्ट्रांनी समान उद्देशांच्या प्राप्तीसाठी एकत्र येऊन संघराज्य निर्मीतीचे प्रयोग केल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी इंग्लंडशी लढा देऊन स्वातंत्र्य प्राप्त केलेल्या अमेरिकेने सन १७८९ मध्ये जगातील पहिले संघराज्य स्थापन केले.आस्ट्रेलिया, कॅनडा, स्वित्झलॅड, दक्षिण अफ्रीका व भारत ही संघराज्य शासन प्रध्दतीचा स्विकार केलेली प्रमुख राष्ट्रे होत. संघराज्य शासन पध्दती म्हणजे केद्र आणि घटकराज्यातील एक प्रकारचा करार असून या कराराद्वारे केंद्र आणि घटकराज्यात शासनविषयक अधिकारांची राज्यघटनेद्वारे लिखित स्वरुपात विभागणी होय. भारतीय समाजव्यवस्थेत आढळणारी विविधता, सामाजिक, राजकिय, आर्थिक विकासाचे सामायिक उद्दीष्ट, लोकशाही विकेंद्रीकरणाचे तत्व व प्रशासकिय सोय इत्यादी कारणामुळे भारतीय घटनाकारांनी संघराज्य व्यवस्था स्विकारलेली आहे. भारतीय राज्य घटनेनुसार संघराज्यव्यवस्था स्विकारली असली तरी भारतीय संविधानातील कलम १ मध्ये भारत हा राज्यांचा संघ असेल. असे म्हटले आहे. याचा अर्थ भारतीय संघराज्य घटकराज्यातील परस्पर कराराद्वारे स्थापन झालेले नाही, तसेच घटकराज्यांना संघराज्यातून बाहेर पडण्याचा अधिकार मिळालेला नाही असे स्पष्ट होते. भारतीय संघराज्याला विविध राजकिय विचारवंतानी पुढील संबोधने दिलेली आहेत. के.सी.व्हीअर यांनी अर्ध संघराज्य संबोधुन भारतीय राज्य एकात्म शासनाची दुय्यम स्वरुपाची वैशिष्ट्ये असणाऱ्या संघराज्याऐवजी भारतीय संघराज्य दुय्यम स्वरुपाचे संघराज्य शासनाचे वैशिष्ट्ये असणारे एकात्म राज्य असल्याचे म्हटले आहे. आयव्हर जेनिंग्ज यांनी प्रबळ केंद्रीकरणाची प्रवृत्ती असणारे संघराज्य संबोधले आहे. तर मॅरिस जोन्स यांनी भारतीय संघराज्याचा उल्लेख वाटाघाटीचे संघराज्य असा केलेला आहे.ग्रॅनव्हील ऑस्टीन यांना भारत सहकारीस्वरुपाचे संघराज्य वाटते.कन्हैयालाल मनुशी म्हणतात भारतीय संघराज्य एकात्म राज्याची अनेक वैशिष्ट्ये असलेले अर्ध संघात्मकस्वरुपाचे संघराज्य आहे. प्रा.अलेक्झॉड्रोविझ यांनी भारतीय राज्यघटनेची इतर कोणत्याही देशांच्या राज्यघटनेत न आढळणारी वैशिष्ट्ये विचारात धेवुन भारतीय संघराज्य हे आगळेवेगळे असल्याचे मत नोंदवले आहे. पी.टी. चाको यांच्या शब्दात भारतीय राज्यघटनेचे बाह्यरुप संघात्मक असेल परंतु प्रत्यक्षात त्यात एकात्म शासनाची स्थापना केल्याचे म्हटले आहे. बी.एम.गुप्ता यांनीही भारत हे संघराज्य नसून ते एक विकेंद्रीत एकात्म राज्य आहे असे मत मांडले. भारतीय राज्यघटनेचे अभ्यासक दुर्गादास बसु यांच्या मते भारतीय राज्यघटना पूर्णपणे संघात्मकही नाही आणि एकात्मही नाही तर ती या दोन्हीचे मिश्रण होय. केंद्र आणि राज्य शासनाच्या दोन घटनात्मक पातळ्यांची तरतूद, केंद्र आणि घटकराज्य शासनामध्ये अधिकारांचे संविधानानूसार वाटप, लिखित राज्यघटना, स्वतंत्र न्यायव्यवस्था, दोन सभागृहाचे केंद्रीय कायदेमंडळ ही संघराज्याची सर्वसाधारण ५ वैशिष्ट्ये भारतीय संघराज्यालाही लागु होतात. यासोबतच प्रबळ केंद्र सरकार, केंद्र व घटकराज्यांसाठी एकच राज्यघटना, एकेरी नागरिकत्व, घटराज्यांच्या अस्तित्वाच्या हमीचा अभाव, एकात्म न्यायव्यवस्था, राज्यसभेत घटकराज्यांना समान प्रतिनिधीत्व नसणे, आणीबाणीविषयक तरतुदी, राज्यपालांची केंद्रसरकारद्वारे नियुक्ती, इत्यादी तरतुदी केंद्रसरकारला प्रबळ अधिकार प्रदान करतात. त्यामुळेच भारतीय संघराज्य पूर्ण संघराज्य नसून एकात्मस्वरुपाचे संघराज्य आहे अशी टिका केली जाते. सारांश संघराज्य शासन म्हणजे जगातील कोणत्याही राष्ट्रातील केंद्रसरकार व घटक राज्यसरकारामध्ये शासनविषयक अधिकारांची राज्यघटनेनुसार लिखीत स्वरुपात विभागणी केलेली शासनव्यवस्था होय. या अर्थानुसार भारत हे जगातील संघराज्य शासनव्यवस्था असलेला एक प्रमुख देख मानला जातो.

**भारतीय संघराज्याची प्रतीमाने :-**भारतीय राजकारणातील साधारणपणे सात दशकातील बदला सोबतच संघराज्यातल्या स्वरुपातही बदल झालेले आहे.या बदलाच्या आधारे भारतीय संघराज्याची पुढीलप्रमाणे चार प्रतीमाने अस्तित्वात आल्याचे स्पष्ट होते.

**१) केंद्रीकृत संघराज्य (१९५० ते १९६७)**

भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सन १९५० ते १९६७ या दोन दशकामध्ये केंद्रीकृत संघराज्याचे प्रतीमान अस्तित्वात होते.सन १९५० ते १९६४ पर्यंत भारतीय राजकारणात तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचे वर्चस्व होते.याला नेहरु युग असे म्हटले जाते.या कालावधीत केंद्र व घटकराज्यात मैत्रीपूर्ण, संबंध प्रस्थापीत होऊन केंद्र व घटकराज्यात तीव्र स्वरुपाचे मतभेद निर्माण झाले नव्हते. त्यामुळे केंद्रीकरणाची प्रवृत्ती निर्माण झाली. या कालखंडात केंद्र व घटकराज्यात कॉंग्रेसची सत्ता असल्याने केंद्र व राज्यातील मतभेदांचे निवारण कॉंग्रेसच्या संघटनात्मक पातळीवर केले जात असल्याने केंद्र व घटकराज्यात संघर्ष न होता मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापीत झाले होते.

**२) सहकारी संघराज्य (१९६७ ते १९७१)**

सहकारी संघराज्याचे प्रतीमान किंवा संकल्पना सर्वप्रथम १९३३ मध्ये अमेरिकेत उदयाला आली.सहकारी संघराज्यात केंद्रसरकार आणि घटकराज्य सरकारे सामंजस्यशाने एकत्रीत काम करतात. घटनातज्ञ सेटलवाड यांच्या मते सन १९६७ मधील चौथ्या सार्वत्रीक निवडणूकीनंतर भारतातील सत्तेचे केंद्र घटकराज्यांकडे झुकले. कॉंग्रेस पक्षाची एकहाती शासनसत्ता अनेक घटकराज्यात संपुष्टात येऊन केंद्रात पंडित नेहरु सारखे प्रभावी व्यक्तिमत्वाचे पंतप्रधान नसल्यामुळे राष्ट्रीय विकास परिषदेत अनेक मुख्यमंत्र्यांनी केंद्रसरकार विरोधी आवाज उठवायला सुरुवात केली. नेहरुंच्या निधनानंतर घटकराज्याचे मुख्यमंत्री सत्तेचे केंद्र बनुन केंद्रसरकारला आव्हान देऊ लागले. सन १९६९ मध्ये कॉंग्रेस पक्षात प्रथमच मोठी फुट पडून लोकसभेतील कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व कमी झाल्याने केंद्रीय नेतृत्वाला, केंद्रसरकारला घटकराज्यांच्या मागण्यापुढे झुकावे लागले. एकंदरीत सन १९६७ ते १९७१ या काळात केंद्रसरकार व घटकराज्य सरकारात परस्पर सहकार्य प्रस्थापीत होऊन सहकारी संघराज्याचे प्रतीमान अस्तित्वात आले. सहकारी संघराज्याचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे केंद्र आणि घटकराज्य सरकारांचे परस्परावलंबन होय. सहकारी संघराज्याच्या प्रतीमानात केंद्रसरकार शक्तीशाली असले तरी घटकराज्य सरकारे सुध्दा दुबळी नसतात. त्यामुळे केंद्र व घटकराज्य सरकारे परस्पर सहकार्याने काम करतात.

**३) एकात्म संघराज्य (१९७१ ते १९७७, १९८० ते १९८९)**

सन १९७१ मधील पाचवी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक तसेच सन १९७२ मधील राज्य विधानसभा निवडणुकानंतर सन १९७७ पर्यंत व पुढे १९७७ ते १९८० हा जनतापक्ष केंद्रीय राजवटीचा अपवाद वगळता दोन तथ्य समोर आली पहिले म्हणजे भारतीय राजकारणात श्रीमती इंदिरा गांधी व संजय गांधी हे दोन कॉंग्रेस पक्षाचे सर्वमान्य नेते आहेत व दुसरे म्हणजे कॉंग्रेस पक्षच भारतात स्थीर शासन देऊ शकतो, भारतीय जनतेचे नेतृत्व करु शकतो अशी धारणा झाली. एकंदरीत या काळात सत्तेचे केंद्र केंद्रसरकारकडे झुकले. या काळात पंतप्रधान इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस सरकारने सन १९७६ मध्ये आणीबाणीच्या काळात विविध राज्यघटना दुरुस्त्या करुन भारतात एकात्म संघराज्याचे प्रतीमान असल्याचा प्रत्यय आणुन दिला. २५ जून १९७५ ते मार्च १९७७ या काळात पंतप्रधान इंदिरा गांधीनी देशाअंतर्गत असंतोषाच्या कारणाखाली राष्ट्रीय आणीबाणी लागु करुन भारताला एकात्म संघराज्याचे स्वरुप दिले होते.

**४) सौदेबाजीचे संघराज्य (१९९० पासून पुढे) :-**

सन १९७७ सहाव्या लोकसभा निवडणुकानंतर भारतीय राजकारणात आमुलाग्र बदल झाला.सन १९७७ मध्ये कॉंग्रेसचा लोकसभा निवडणुकीत पराभव होऊन केंद्रात मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाचे सरकार सत्तेत आले.त्या सोबतच विविध घटक राज्यामध्येही कॉंग्रेसेतर राजकीय पक्षांची सरकारे सत्ते आली, त्यामुळे राज्य सरकारानी केंद्र सरकार सोबत सौदेबाजीचा प्रयत्न केला.या काळात काही राज्यांनी राज्य स्वायत्ततेचा आग्रह सुरु केला.सन १९८९ ते २००९ लोकसभा सार्वत्रिक निवडणुकामधुन हे स्पष्ट झाले की, भारतात सौदेबाजीचे संघराज्य प्रतिमान अस्तीत्वात आलेले होते.विश्वनाथ प्रताप सिंग (१९८९), चंद्रशेखर (१९९०), पी.व्ही. नरसिंहराव (१९९१), एच.डी.देवेगौडा (१९९६), इंद्रकुमार गुजराल (१९९७), अटलबिहारी बाजपाई (१९९८ व १९९९) तसेच डॉ.मनमोहन सिग (२००४ व २००९) यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारे अल्पमतातील सरकारे असल्यामुळे त्यांना सत्ता टिकवण्यासाठी प्रादेशिक पक्षांचा आधार घ्यावा लागला होता. अनेक राज्यामधील प्रादेशिक पक्षांच्या सरकारानी विविध मुद्दांवर व विषयांवर केंद्र सरकारशी सौदेबाजी केल्याचे स्पष्ट होते. एकंदरीत सन १९८९ ते २००९ या काळातील साधारणपणे अडीच दशके केंद्रात सतेत आलेल्या विविध राजकीय पक्षांच्या आघाडी सरकारांची घटकराज्यातील प्रादेशिक पक्षांच्या सरकारानी सौदेबाजी केल्याचे विविध उदाहरणावरुन दिसून आले. सन २०१४ सोळावी लोकसभा व सन २०१९ सतरावी लोकसभा निवडणुकात भारतीय जनता पक्षाला नरेंद्र मोदींच्या वलयांकीत नेतृत्वामुळे स्पष्ट बहुमत मिळाल्यामुळे विविध घटक राज्यातील प्रादेशिक पक्षांच्या सरकाराकडून होणाऱ्या सौदेबाजीच्या राजकारणाला काही प्रमाणात आळा बसल्याचे दिसून येते. असे असले तरी या काळात सुध्दा केंद्र आणि घटक राज्यातील सौदेबाजीचे राजकारण काही प्रमाणात अस्तित्वात असल्याचे दिसून येते.

**भारतीय संघराज्याचे बदलते स्वरुप :-**

सन १९९० नंतरच्या सामाजिक, आर्थिक, राजकिय बदलामुळे भारतीय संघराज्याचे स्वरुप बदलत आहे.भारतीय संघराज्य पूर्णपणे संघराज्यीय नसून त्यामध्ये केंद्रसरकारचे अधिकार वाढविणाऱ्या विविध घटनात्मक तरतूदी आहेत.त्यामुळे भारतीय संघराज्य हे अर्ध संघराज्य व अर्ध एकात्मक संघराज्य असल्याचे भाष्य भारतीय संघराज्याच्या अभ्यासकांनी केले आहे.सन १९९० नंतरच्या भारतीय राजकारणात संघराज्याच्या संदर्भात पुढील चार प्रवाह आढळतात.

**१) राज्यनिर्मीतीसाठी भाषांऐवजी आर्थिक सांस्कृतिक घटक जास्त महत्वाचे**

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संघराज्य रचनेचा व फेररचनेचा आधार भाषा हा होता.भाषेच्या आधारावर भारतात सन १९५३ पासून विविध भाषीक घटकराज्ये अस्तित्वात आली.परंतु सन १९९० नंतरच्या काळात भाषीक आधाराऐवजी सांस्कृतीक, विकास व आर्थिक आधार राज्यरचना व फेररचनेसाठी जास्त महत्वाचा ठरत आहे.भाषीक घटकराज्यांची फेररचना करुन विकास आर्थिक व सांस्कृतीक आधारावर अनेक घटकराज्यांची मागणी जोर धरत आहे. उदाहरणार्थ १५ नोव्हेंबर २००० मध्ये अटलबिहारी बाजपाईच्या नेतृत्वाखाली केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने झारखंड, छतीसगड, ही दोन स्वतंत्र घटकराज्ये या भागातील आदिवासींच्या सांस्कृतीक व वांशीक अलगतेच्या मागणीआधारे निर्माण केली. तसेच सांस्कृतीक अस्मिते सोबतच प्रादेशिक अस्मितेच्या पर्वतीय भागातील जनतेच्या आशा-आकांशेचा पुरस्कार करणारे उत्तरांचल घटकराज्य निर्माण केले. २ जुन २०१४ रोजी आंध्र प्रदेश या तेलगु भाषीक राज्याची फेररचना करुन अस्तित्वात आलेले तेलंगणा हे भारतीय संघराज्यातील २९ वे घटकराज्य भाषीक आधाराऐवजी विकास व आर्थिक आधारावर अस्तित्वात आल्याचे स्पष्ट होते. सन १९९० नंतर भारतातील विविध भाषीक घटकराज्यांची फेररचना करुन नवीन घटकराज्यांची मागणी विकास व आर्थिक घटकाच्या आधारे करण्यात येत असल्याचे आढळते.उदाहारणार्थ महाराष्ट्रातून विदर्भ, मराठवाडा या दोन घटकराज्यांची मागणी केली जात आहे.याशिवाय उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल इत्यादी भाषीक घटकराज्याची फेररचना करुन विकास, आर्थिक व सांस्कृतीक घटकांच्या आधारावर घटकराज्य निर्मीतीची मागणी सातत्याने जोर धरत आहे.

**२) राष्ट्रीय पक्षांचा ऱ्हास व केंद्रशासनाचे सहमतीचे राजकारण :-**

भारतीय राजकारणात सन १९८९ पासून राष्ट्रीय पातळीवरील राष्ट्रीय दर्जाच्या राजकीय पक्षांचा ऱ्हास होत असल्यामुळे व प्रादेशिक पक्षांचा राजकिय प्रभाव वाढत असल्यामुळे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पक्ष इत्यादी राष्ट्रीय पक्षांना केंद्रात सत्ता स्थापन करण्यासाठी प्रादेशिक पक्षांच्या किंवा इतर लहान पक्षांच्या पाठींब्यावर अवलंबुन रहावे लागत असल्याने केंद्रातील राष्ट्रीय पातळीवरील सत्ताधारी राजकिय पक्षांच्या आघाडी सरकारांना सहमतीच्या आधारावर राज्यकारभार चालविणे अपरिहार्य झालेले आहे.

**३) केंद्राला राज्यांचे अधिकार मर्यादीत करणे अशक्य :-**

भारतातील राष्ट्रीय पक्षांचा ऱ्हास होऊन राजकीय प्रभाव कमी होत चालल्यामुळे प्रादेशिक राजकिय पक्षांचा प्रभाव वाढत असल्यामुळे केंद्रात आघाडी सरकारे अपरिहार्य ठरली आहेत.परिणामी केंद्र सरकारला पुर्वीप्रमाणे आपल्या अधिकाराचा गैरवापर करणे, अथवा राज्यांच्या अधिकाराना मर्यादीत करणे शक्य होत नाही.त्यामुळे घटक राज्यांना सामावुन घेतच केंद्रसरकारला शासनकारभार करावा लागत आहे.

**४) केंद्राला मनमानी पध्दतीने राज्यांत आणीबाणी लादणे अशक्य :-**

सन १९९४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने कर्नाटकचे तत्कालीन जनता दल सरकारचे मुख्यमंत्री एस.आर.बोम्मई खटल्यात राज्यघटनेच्या ३५६ कलमाच्या द्वारे घटकराज्यात आणीबाणी लादण्यावर काही नियमाद्वारे बंधने घातली आहेत. त्यामुळे केंद्रसरकारला सन १९९४ नंतर आपल्या मर्जीप्रमाणे घटकराज्यात कलम ३५६ अन्वये घटकराज्यात राष्ट्रपती शासन लादने अशक्य झालेले आहे.

**समारोप :-**

भारताने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर संघराज्य शासनपध्दतीचा स्विकार केला असून संविधानात संघराज्य या शब्दाचा उल्लेख नसुन भारत हा राज्यांचा संघ असल्याचे म्हटले आहे.भारतीय संविधानात संघराज्य या शब्दाचा उल्लेख केलेला नसला तरी वास्तवात भारत एक संघराज्य आहे हे स्पष्ट होते. केंद्र व राज्यसरकारच्या दोन पातळ्यांची तरतूद, संविधानानुसार केंद्र व घटकराज्य शासनामध्ये लिखीत अधिकारांची विभागणी, लिखीत राज्यघटना, स्वतंत्र न्यायव्यवस्था, द्विगृही केंद्रीय कायदेमंडळ या संघराज्याच्या सर्वसाधारण प्रमुख वैशिष्ट्यांसह प्रबळ केंद्रसरकार, केंद्र व घटकराज्यांसाठी एकच राज्यघटना, एकेरी न्यायव्यवस्था, एकेरी नागरिकत्व इत्यादी भारतीय संघराज्याची वेगळी वैशिष्ट्य आढळतात. स्वातंत्र प्राप्तीपासून आजपर्यंतच्या काळात केंद्रीकृत संघराज्य (१९५० ते १९६७), सहकारी संघराज्य (१९६७ ते १९७१), एकात्म संघराज्य (१९७२ ते १९८९ अपवाद १९७७ ते १९८० जनता पक्ष राजवट) व सौदेबाजीचे संघराज्य (सन १९९० पासून आजपर्यंत) ही भारतीय संघराज्याची चार प्रतीमाने अस्तित्वात आल्याचे स्पष्ट होते.

सन १९९० नंतरच्या काळात भारतीय संघराज्यांच्या स्वरुपात काही बदल झाल्याचे स्पष्ट होते. घटकराज्याच्या फेररचनेसाठी भाषा या घटकाऐवजी विकास, आर्थिक व सांस्कृतीक या घटकांना मिळालेले अधिक महत्व, राष्ट्रीयस्तरावरील राजकीय पक्षांचा ऱ्हास व प्रादेशिक पक्षांचे वाढते प्राबल्य यामुळे केंद्रात आघांड्यांचे सरकारचे पर्व सुरु झाल्यामुळे केंद्र

सरकारचे घटकराज्य सरकारसोबत प्रस्थापीत झालेले सहमतीचे राजकारण, केंद्रसरकारला आपल्या मर्जीनुसार कलम ३५६ अन्वये घटकराज्यात आणीबाणी लादणे अशक्य होणे, सन १९९० मध्ये स्थापन झालेली आंतरराज्य परिषद तसेच सन २०१५ मध्ये राष्ट्रीय विकास परिषद विसर्जीत करुन अस्तित्वात आलेला निती आयोग इत्यादी घटकांमुळे भारतीय संघराज्यांच्या स्वरुपात बदल होत असल्याचे दिसून येते.

**संदर्भसूची :-**

१)जाधव तुकाराम, पाटील मल्हार, प्रथमावृत्ती जानेवारी २०११, भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतिबंध, खंड १ भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया, द युनिट अॅकॅडमी पुणे.

२)बाचल वि.मा., सातवी आवृती २०१४, भारतीय राज्यघटना आणि राजकिय व्यवहार, के.सागर पब्लीकेशन्स् पुणे

३)पाटील व्ही.बी., दुसरी आवृती २०११, भारतीय राज्यव्यवस्था महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह, के.सागर पब्लीकेशन्स पणे

४)घायाळ विनायक, पहिली आवृत्ती २०१८, भारतीय राज्यघटना, के.सागर पब्लीकेशन्स पुणे.

५)वराडकर र.घ., पहिली आवृत्ती एप्रिल २०१२, भारतीय राज्यघटना, राजकारण आणि कायदा, निराली प्रकाशन पुणे

६)लक्ष्मीकांत एम. (अनुवाद गोखले श्रीकांत) पहिली आवृत्ती २०१७, इंडियन पॉलीटी, के.सागर पब्लीकेशन्स पुणे.

७)जैन पुखराज, फडीया बी.एल., २०१०, भारतीय शासन एवं राजनिती, साहित्यभवन पब्लीकेशन्स आग्रा

८)पळशीकर सुहास, पहिली आवृत्ती १६ फेब्रुवारी २०२०, संघराज्याचे बदलते स्वरुप, भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह, क्रिएटीव्ह पब्लीकेशन्स नांदेड.